GRT

Golden Research Thoughts

ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 6 | December - 2016

महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा राजमार्ग सेवा क्षेत्र

श्री सुर्यवंशी एस.डी.
संशोधक विद्यार्थी, पीएच.डी.अर्थशास्त्र, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

प्रस्तावना

महाराष्ट्राच्या आर्थिक आरोग्याची कल्पना देणारा महत्त्वाचा निर्देशक म्हणजे राज्याचे उत्पन्न होय. राज्याच्या उत्पन्नाचे वर्गीकरण कृषीक्षेत्र, उद्योग क्षेत्र आणि सेवा क्षेत्र असे केले जाते. राज्याच्या समतोल आर्थिक विकासामध्ये या तीन क्षेत्रांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे. राज्याच्या आर्थिक विकासातील कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्राचा विचार करता, सेवाक्षेत्राची वृध्दी नेहमीच कृषी आणि उद्योग क्षेत्रापेक्षा अधिक राहिली आहे. सेवा क्षेत्रात रेल्वे, परिवहन व साठवण, दळणवळण, व्यापार, हॉटेल्स व उपहारगृह, विमा आणि विमा उद्योग, स्थावर मालमत्ता व राहत्या घरांची मालकी, व्यवसाय सेवा, विधी सेवा, सार्वजनिक प्रशासन, इतर सेवा यांचा समावेश केला जातो.

राज्याची अर्थव्यवस्था ज्या तीन क्षेत्रावर आधारित आहे, त्या क्षेत्रामधील सेवा क्षेत्राच्या वाढत्या प्रभावामुळे अनेक क्षेत्रातील मंडळी विचारात पडले आहेत. राज्याच्या एकूण उत्पन्नाचा विचार करता, चालूकिंमतीनुसार सन २०१०-

१३ या वर्षाचे अंदाजीतस्थूल राज्य उत्पन्नाचा देशांतर्गतस्थूल उत्पन्नात राज्याचा सुमारे १४.१ टक्के आहे. राज्यातील औद्योगिक (२७.४ टक्के), सेवा (६१.७) या दोन्ही क्षेत्रांचा राज्य उत्पन्नात एकत्रित हिस्सा ८९.१ टक्केतर कृषी व संलग्न कार्ये या क्षेत्राचा हिस्सा १०.९ टक्के आहे. म्हणजे राज्याच्या अर्थव्यवस्थेचा सर्व अंगातून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नापैकी निम्म्याहून अधिक भाग सेवा क्षेत्राचा असल्याने राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये सेवा क्षेत्राचे प्राबल्य वाढत आहे.

उद्देश:

१.महाराष्ट्रातील सेवा क्षेत्राच्या सद्य स्थितीचा आढावा घेणे

२.वाहतूक, दळणवळण आणि साठवण यांचा अभ्यास करणे

संशोधन पध्दती

महाराष्ट्राच्या आर्थिक विकासातील सेवा क्षेत्राचे योगदान याचा अभ्यास करण्यासाठी सेवा क्षेत्राची सद्य स्थिती व सेवाक्षेत्रातील वाहतूक, दळणवळण आणि साठवण ही चले घेतली आहेत. सेवा क्षेत्राचा आर्थिक विकासातील योगदानाचा अभ्यास करण्यासाठी २००४-०५ ते २०१३-१४ हा कालावधी निश्चित केला आहे. अभ्यासासाठी दुय्यम आकडेवारी नियोजन आयोग, रिझर्व बँक ऑफ इंडिया, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१३-१४ मधून घेतली आहे.

सेवा क्षेत्राचा वृध्दी दर:

आकृती क्र.१ मध्ये महाराष्ट्र उत्तराखंड, मिझोराम आणि केरळही राज्ये निवडून त्यांचा सेवा क्षेत्रातील वृध्दीदर मांडला आहे. सन २००६ ते २०१३ दरम्यानचा विचार करता. या राज्यातील सेवा क्षेत्राचा वृध्दी दर घटला असल्याचे दिसून येत आहे. सन २००६ मध्ये सर्वाधिक वृध्दी दर उत्तराखंड राज्यात ४६.६६ टक्केहोता. तर ३.१४ टक्के मिझोराम मध्येहोता. याच वर्षातील महाराष्ट्रातील सेवा क्षेत्राचा वृध्दी दर ११.३२ टक्केहोता.

आकृती क्र. १
सेवा क्षेत्र वृध्दी दर २००६-१३



सन २०१३ मध्ये सेवा क्षेत्राचा वृध्दी दर विचारात घेतलातर असे दिसते की, उत्तराखंड मधील वृध्दी दर ४६.६६ टक्के वरून घटूनतो ८.७ टक्के झाला आहे. दरम्यान महाराष्ट्रातील सेवा क्षेत्राच्या वृध्दी दरामध्ये घट झाली आहे. तो ११.३२ टक्क्यावरून ८.४७ टक्क्यावर आला आहे. मिझोराममध्ये सन २००६ मध्येहा दर ३.१४ टक्केहोता. तो वाढून सन २०१३ मध्ये ६.७ टक्के झाला. महाराष्ट्र, उत्तराखंड, मिझोराम आणि केरळ या राज्यातील सेवा क्षेत्राच्या वृध्दीचा विचार केलातर असेस्पष्टहोते की, अन्य राज्यांपेक्षा महाराष्ट्रातील सेवा क्षेत्राचा वृध्दी दरतुलनात्मकदृष्ट्यास्थिर राहिला आहे.

राज्यनिहायस्थूल राज्य उत्पन्नातील सेवा क्षेत्राचा हिस्सा (२०१३)

आकृती क्र.२ मध्ये राज्यनिहायस्थूल राज्य उत्पन्नातील सेवा क्षेत्राचा हिस्सा दाखविला आहे. सन २०१३ मध्ये देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील सेवा क्षेत्राचा हिस्सा ५९.५७ टक्केहोता परंतु त्याचवेळी देशातील चंदिगड, दिल्ली, केरळ, प.बंगाल, आणि महाराष्ट्र यांच्या स्थूल राज्य उत्पन्नातील हिस्साहा ६० टक्क्यापेक्षा अधिकहोतो. यावरून हेस्पष्टहोते की, देशातील अधिकतर राज्यांच्या स्थूल राज्य उत्पन्नात सेवा क्षेत्राचे प्राबल्य असल्याचे दिसते. म्हणजे या राज्यांच्या आर्थिक विकासाचा भार हा प्रामख्याने सेवा क्षेत्रावर आधारित आहे. चंदीगड आणि दिल्ली या दोन राज्यांच्या उत्पन्नातील सेवा क्षेत्राचा हिस्सा ८५ टक्क्यापेक्षा अधिक आहे. तर सर्वात कमी छत्तीसगड (३४.८ टक्के) आहे.

आकृती क्र.२
राज्यनिहायस्थूल राज्य उत्पन्नातील सेवा क्षेत्राचा हिस्सा (२०१३)



क्षेत्रनिहाय महाराष्ट्रातील आर्थिक वृध्दी (२००५-१३):

आकृती क्र.३ मध्ये महाराष्ट्रातील क्षेत्रनिहाय आर्थिक वृध्दी २००५-०६ ते २०१२-१३ दाखविली आहे. कृषी विनिर्माण क्षेत्र, उद्योग आणि सेवा क्षेत्राचा आर्थिक वृध्दी दर दाखविला आहे. सन २००५-०६ मधील राज्यातीलस्थूल राज्य उत्पन्नाचा वृध्दी दर विचारात घेता, विनिर्माण क्षेत्राचा वृध्दी दर २४.९२ टक्के, कृषी क्षेत्र ९.२ टक्के, उद्योग १८.९३ टक्के, सेवा क्षेत्र ११.३२ टक्केहोता. सन २००८ च्या मध्यावधी मध्ये जागतीक मंदी निर्माण झालीहोती. त्याचा परिणाम राज्याच्या अर्थव्यवस्थेतील वृध्दी दरात झाल्याचेस्पष्ट दिसत आहे. सन २००८-०९ मध्ये राज्याच्या कृषी, विनिर्माण क्षेत्र आणि उद्योग क्षेत्रामध्ये उणे वृध्दी दरनोंदविला आहे. तर सेवा क्षेत्राचा वृध्दी दर ७.९६ टक्केहोता.म्हणजे जागतीक आर्थिक मंदिच्या वेळी राज्याच्या अर्थव्यवस्थेला सेवा क्षेत्राने आधार दिला. सन २००८-०९ ते २०१०-११ या दरम्यान अर्थव्यवस्थेतील क्षेत्रांमध्ये वृध्दी झालेली आहे. त्यानंतर राज्यातील आर्थिक वृध्दी दर स्थिरावला आहे. सन २०१२-१३ मध्ये कृषी क्षेत्राचा वृध्दी दर -२.१४ टक्केहोता. तर सेवाक्षेत्राचा वृध्दी दर ८.४७ टक्केहोता. सन २००५-०६ च्या तुलनेत २०१२-१३ मध्ये राज्याच्या कृषी, विनिर्माण, उद्योग आणि सेवा क्षेत्रामध्ये घट झालेली दिसते.

आकृती क्र.३
क्षेत्रनिहायस्थूल राज्य उत्पन्नातील सेवा क्षेत्राचा हिस्सा (२०१३)



सेवा क्षेत्र- औद्यागिकस्त्रोतानुसार निव्वळ राज्य उत्पन्न-चालुकिंमतीनुसार

तक्ता क्र.१ मध्ये महाराष्ट्रातील सेवा क्षेत्राचा औद्योगिकस्त्रोतानुसार निव्वळ राज्य उत्पन्नातील, रेल्वे, वाहतुक, साठवण आणि दळणवळण या घटकांचे सेवा क्षेत्रातील योगदान दाखविले आहे.

राज्यातील सेवाक्षेत्राच्या सरासरी वृध्दी दराचा विचार करतातो सन २००४-०५ ते २०१३-१४ दरम्यान १५.८४ टक्के इतका राहिला आहे. तर त्याच दरम्यान रेल्वे, वाहतूक, साठवण आणि दळणवळण यांचा एकत्रित सरासरी वृध्दी दर १४.४३ टक्के इतका राहिला आहे. म्हणजे सेवा क्षेत्राच्या तुलनेत या घटकांचा वृध्दी दर कमी आहे. वाहतूक आणि दळणवळण यांचा स्थूल राज्य उत्पन्नातील हिस्सा सन २००४-०५ मध्ये ११.०८ टक्केहोता. तो सन २०१३-१४ मध्ये कमीहोऊन १०.०३ टक्के झाला आहे. सन २००४-०५ मध्ये रेल्वे आणि दळणवळण यांचा सेवा क्षेत्रातील हिस्सा अनुक्रमे ८.१८ टक्के वरून ७.०३ टक्के (रेल्वे) तर २४.१४ टक्के वरून १८.११ टक्के (दळणवळण) कमी झाला आहे. तर दरम्यानच्या काळात वाहतूकीचा हिस्सा ६७.०५ टक्केवरून ७४.०८ टक्क्यापर्यंत वाढला आहे. त साठवणचा ०.६२ टक्केवरून ०.७५ टक्केपर्यंत वाढला आहे.

रेल्वे, वाहतूक, साठवण आणि दळणवळण यांचे निव्वळ राज्य उत्पन्न २८६१६१० लाख इतके सन २००४-०५ मध्येहोते. ते वाढून ९६०७८२१ लाख रूपये सन २०१३-१४ मध्ये झाले. सन २००४-०५ च्या तुलनेत सन २०१३-१४ मधीलही निव्वळ उत्पन्नातील वाढ २३५.७५ टक्के आहे. तर याच दरम्यान संपूर्ण अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्राची वाढ २७५.२५ टक्के आहे.

रेल्वे, वाहतूक, दळणवळण आणि साठवण यांच्या निव्वळ उत्पन्नात झालेल्या वाढीचा विचार करता सर्वात जास्त वाढ ही साठवण क्षेत्रात झाली आहे. तर सर्वात कमी दळणवळण मध्ये झाली आहे.

औद्योगिकस्त्रोतानुसार निव्वळ राज्य उत्पन्न-चालुकिंमतीनुसार (२००४-०५ ते २०१३-१४) (लाख रुपये)

वर्ष	रेल्वे (०१)	वाहतूक (०२)	साठवण (०३)	दळणवळण (०४)	एकूण (५) (१ ते ४)	सेवाक्षेत्र	% वृध्दी दर (०५)	% वृध्दी दर सेवाक्षेत्र
२००४-०५	२३४१६४	१९१८७७१	१७७४९	६९०९२६	२८६१६१०	२२९७५५०२	-	-
२००५-०६	२४२२१२	२१५००२५	१८८३३	७६०५०४	३१७१५७४	२५८९३०२२	१०.८३	१२.७०
२००६-०७	२७७८७८	२६१४०३५	२२६६२	८१२८३९	३७२७४१४	३०७०९०८३	१७.५३	१८.६०
२००७-०८	३२००२६	२९८५७९९	२५७४५	९३३८८१	४२६५४५१	३५५४०४९८	१४.४३	१५.७३
२००८-०९	३७०६१८	३४११०८२	३१६८९	१०५६६४७	४८७००३६	४०९३८५६५	१४.१७	१५.१९
२००९-१०	५२०८७१	३९५८५८३	४०८५८	११८८७६९	५७०९०८१	४७४३९४३९	१७.२३	१५.८८
२०१०-११	४५०१२४	४६०२५९४	४०९९१	११६०४५२	६२५४१६१	५६४३२६३८	९.५५	१८.९६
२०११-१२	५१४७५६	५३७०८४८	५१६८६	१२५०४७८	७१८७७६८	६५३१४९७८	१४.९३	१५.७४
२०१२-१३	५७९९३४	६१८७९७४	६०४१८	१४४३८३४	८२७२१६०	७५५५५७०९	१५.०९	१५.६८
२०१३-१४	६७५०९४	७११७११६	७५८०१	१७३९८१०	९६०७८२१	८६२१६२२३	१६.१५	१४.११
हिस्सा२००४-०५	८.१८%	६७.०५%	०.६२%	२४.१४%	११.०८%	८८.९२%		
२०१३-१४	७.०३%	७४.०८%	०.७९%	१८.११%	१०.०३%	८९.९७%		
सरासरी	४१८५६७.७	४०३१६८३	३८६४३.२	११०३८१४	५५९२७०७.६	४८७०१५६६	१४.४३	१५.८४
% बदल (२००४-०५ते२०१३-१४)	१८८.३०	२७०.९२	३२७.०७	१५१.८१	२३५.७५	२७५.२५		

निष्कर्ष:

महाराष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये कृषी आणि उद्योग क्षेत्राच्या तुलनेत सेवा क्षेत्राने विशेषत: १९९१ नंतर महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. महाराष्ट्रहे देशात आर्थिक संपन्न राज्य म्हणून ओळखले जाते. अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात सेवा क्षेत्राचा वृध्दी दर कमी आहे. परंतुतो शाश्वत स्वरूपाचा आहे. याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा हिस्सा ५९.५७ टक्के आहे. तर महाराष्ट्राच्या स्थूल राज्य उत्पन्नातील या क्षेत्राचा हिस्सा भारतापेक्षा अधिक म्हणजे ६३.१७ टक्के आहे. हे सन २००८-०९ मध्ये जागतीक आर्थिक मंदी आलीहोती तेव्हा त्याचा परिणाम भारतासह महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर झाला. मंदीच्या वेळी राज्यातील कृषी, उद्योग, विनिर्माण क्षेत्र यांच्या वृध्दी दरामध्ये मोठी घट नोंदविण्यात आली. परंतू मंदीत देखील राज्यातील सेवा क्षेत्राचा वृध्दी दर ७.९६ टक्के राहिला. म्हणजेच राज्याच्या अर्थव्यवस्थेला मंदीतून सावरण्यात सेवा क्षेत्राने महत्त्वाची भूमीका पार पाडली आहे. म्हणून महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाचा राज मार्ग सेवा क्षेत्र आहे.

संदर्भ:

१. नियोजन आयोग, भारत सरकार
२. आर्थिक पाहणी, भारत २०१३-१४
३. आर्थिक पाहणी, महाराष्ट्र २०१३-१४
४. दै.लोकसत्ता
५. द.हिंदू
६. RBI, Buletin, March 2014
७. Planning Commission (2008), Report By High Level Group On Service Sector.